PCNTDA
सेवा श्रद्धासमन्विता

# माहितीपत्रक

## पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, आकुर्डी, पुणे-४४.

दुरध्वनी क्रमांक-(०२०)२७१६६०००/२७६५२९३४/२९३५
(विस्तारित क्रमांक १११२)
(Online-www.pcntda.org.in)

## प्राधिकरणातील व्यापारी प्रयोजनाचे पेठ क्र. CDC भूखंड क्र. ३०, ३१, ३२, ४०, ४१, ४२ निविदा पध्दतीने भाडेपट्टा तत्त्वावर वाटप करावयाच्या निविदेच्या अटी व शर्ती

दिनांक:- ---/---/२०१९

**पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण**
नवीन प्रशासकीय इमारत, आकुर्डी रेल्वे स्टेशन जवळ, पुणे - ४११०३५.
दुरध्वनी क्र. : (०२०) २७१६६००० (विस्तारीत ११०२/११०९)

---

**ई-निविदा सुचना क्रमांक भू – ०१ ते ०६ सन २०१९-२०**

प्राधिकरणातील व्यापारी भूखंडांचे वाटप करणेकामी, टेंडर डॉक्युमेंटमध्ये नमूद केल्याप्रमाणे विहीत पात्रता धारण करणाऱ्या इच्छूक निविदाधारकांकडून मोहरबंद ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत.

व्यापारी भूखंडाच्या ई-निविदा वाटप योजनेचा कार्यक्रम खालीलप्रमाणे.

| अ. क्र. | तपशील | काम सुरू दिनांक | वेळ | अंतिम दिनांक | वेळ |
|---|---|---|---|---|---|
| १ | ऑन लाईन निविदा जाहिरात प्रसिद्धी | २८/११/२०१९ | | | |
| २ | कागदपत्र डाऊनलोड करणे | २८/११/२०१९ | १०:०० वा. | ३१/१२/२०१९ | १८.०० वा. |
| ३ | निविदापुर्व बैठक | ०९/१२/२०१९ | १५:०० वा. | | |
| ४ | निविदा सादर करणे | २८/११/२०१९ | १०:०० वा. | ३१/१२/२०१९ | १८.०० वा. |
| ५ | निविदा उघडणे (तांत्रिक लिफाफा) | ०३/०१/२०२० | ११:०० वा. | | |
| ६ | टिप : निविदा अर्ज शुल्क व बयाणा रक्कम फक्त नेट बँकींगद्वारे ई पेमेंट पद्धतीने स्विकारले जाईल. SB MOPS व इतर इंटरनेट बँकींगचा वापर करणाऱ्या निविदाधारकांनी ऑनलाईन पेमेंट चार दिवस आधी करावे. | | | | |

**सूचना :**

अ. ई-निविदाप्रक्रियेमध्ये सहभागी होऊ इच्छिणाऱ्या सर्व पात्र संस्था यांनी ई -निविदा पोर्टल **"https://mahatenders.gov.in"** वर नोंदणी करणे सक्तीचे असून त्यांना लागू असणाऱ्या आवश्यक त्या प्रवर्गाच्या पॅनलवर स्वत:ची नोंदणी करून घेणे गरजेचे आहे.

ब. निविदाधारकांना ई-निविदा भरताना अधिक तपशील आवश्यक असल्यास अथवा कोणत्याही प्रकारच्या अडचणी निर्माण झाल्यास त्यांनी **२४ x ७ टोल फ्री क्रमांक १८००-३०७०-२२३२ तसेच भ्रमणध्वनी क्र. ९१-७८७८००७९७२ किंवा ९१-७८७८००७९७३ वर संपर्क साधावा.**

क. सर्व निविदाधारकांनी निविदेसंबंधी सर्व कागपत्रे ऑनलाईनच सादर करणे बंधनकारक आहे. पोस्टाने, अथवा व्यक्तीश: पाठविण्यात येणारी निविदा स्वीकारली जाणार नाही . निविदाधारकांकडून ऑनलाईन निविदा प्राप्त न झाल्यास निविदा उघडली जाणार नाही.

ड. कोणतेही कारण न देता एक अथवा सर्व निविदा नाकारण्याचा सर्वस्वी अधिकार प्राधिकरणाचा राहील.

इ. सविस्तर अटी व शर्ती, पोर्टलवर पहावयास उपलब्ध आहेत.

फ. सदर निविदा सूचना "**www.pcntda.org.in**" या संकेत स्थळावर पाहण्यास उपलब्ध आहेत.

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
पिं.चिं.न.वि.प्रा., आकुर्डी

# व्यापारी प्रयोजनासाठी राखीव भूखंडाची निविदा पध्दतीने भाडेपट्टा तत्त्वावर वाटप

## निविदेच्या अटी व शर्तीचे माहितीपत्रक

**(विशेष सूचना : सदर माहिती पत्रकातील निविदा अर्ज, अटी व शर्ती काळजीपुर्वक वाचून निविदा अर्ज भरावा. तद्नंतर याबाबत दाखल कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.)**

१) प्रस्तावना :

पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणातर्फे व्यापारी प्रयोजनासाठी विकसित केलेल्या आरक्षित भूखंडाची Online निविदा पद्धतीने ९९ वर्षांच्या भाडेपट्टा तत्वावर वाटप योजना प्रस्तावित करणेत येत आहे.

पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या विकसीत पेठांचे शासन मंजूर अभिन्यासास व्यापारी प्रयोजनाच्या जागांचे नियोजन केलेले आहे. या पेठांमधील नागरिकांना घराजवळ व्यापारी सेवा उपलब्ध होणे आवश्यक असल्याने व्यापारी प्रयोजनार्थ राखीव जागांचे भूखंड अभिन्यासात राखून ठेवलेले आहेत. असे भूखंड, प्राधिकरणाच्या भूवाटप नियम १९७३ व विकास नियंत्रण नियमावली १९७३ मधील तरतूदीस अधिन राहून ९९ वर्षांच्या भाडेपट्टयाने वाटप प्रस्तावित करण्यात येत आहे. या योजनेव्दारे वाटपासाठी प्रस्तावित असलेल्या व्यापारी भूखंडाची, व्यक्ती / इच्छुक संस्थेने समक्ष पाहणी कार्यालयीन वेळेत, कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी करुन या जागांसाठी त्यांच्या सर्वात अधिकत्तम दरांची निविदा Online सादर करावयाची आहे. प्रस्तुत योजनेतील भूखंड वाटपास प्राधिकरण भूवाटप नियम १९७३ व विकास नियंत्रण नियमावली १९७३ च्या तरतूदी बंधनकारक असतील. वाटप योजनेतील भूखंडाचा तपशिल स्वतंत्रपणे सोबतच्या परिशिष्ट - १ मध्ये देण्यात आला आहे. पात्र अर्जदारांना सीलबंद निविदा पध्दतीने वाटप करण्याचे प्रस्तावित आहे. या वाटप योजनेतील भूखंडाचा तपशिल स्वतंत्रपणे सोबतच्या परिशिष्टामध्ये देण्यात आला आहे. पेठनिहाय भूखंडाचे स्थान व प्रत्यक्ष भूखंडाची चतु:सिमेबाबत माहिती सोबतच्या समजुतीच्या नकाशात दर्शविली आहे.

**यासाठी सादर करावयाच्या निविदा अर्जाची किंमत रु. १०,०००/- (अक्षरी रु. दहा हजार फक्त) असून सदरची रक्कम परत केली जाणार नाही.**

२) जागेचा वापर

या योजनेतील **भूखंड ज्या व्यापारी प्रयोजनासाठी आरक्षित करुन वाटप करण्यात येत आहेत त्याचा वापर केवळ व्यापारी किंवा रहिवासी किंवा व्यापारी सह रहिवासी प्रयोजनासाठी करावा लागेल.** तपासणीत या खेरीज अन्य प्रयोजनांसाठी जागेचा वापर केल्याचे निदर्शनास आल्यास **कायदेशीर कारवाई करणेचा / भूखंड परत घेणेचा अधिकार पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण** यांना राहिल.

## ३) <u>निविदा सादर करणे</u> :

१. सदर जाहिरात नमूद केलेल्या मुदतीत व वेळेमध्ये पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण कार्यालयाच्या संकेतस्थळावर (**www.pcntda.org.in**) पाहता येईल.

२. **फॉर्म फी व बयाणा रक्कम e-payment द्वारे वेब साईटवरील सुचनेप्रमाणे जमा करावी.**

३. व्यापारी भूखंड भाडेपट्टा तत्वावर वाटप करताना ई-निविदा प्रद्धतीने निविदा मागविण्यात येत आहेत. ई-निविदा (१) **तांत्रिक लिफाफा** व (२) **वाणिज्य लिफाफा** या पद्धतीने अपलोड करावी.

## ४) <u>निविदा अर्ज भरणे</u> :

१. निविदा अर्जात बिनचूक माहिती भरणे आवश्यक आहे. चुकीची वा अर्धवट माहिती भरल्यास व निविदा ग्राह्य न झाल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी निविदाधारकाची असेल.

२. आवश्यक तेथे आकडे अंकात व अक्षरात लिहावे.

३. एका पेक्षा जास्त भूखंडांसाठी अर्ज करता येईल.

४. निविदा अर्ज भरण्यापूर्वी मागणी करावयाचा भूखंड व त्याचा आजूबाजूचा परिसर , अंदाजे क्षेत्रफळ समक्ष पहावे. भूखंड आहे त्या स्थितीत वाटप करावयाचे आहेत. हे पाहूनच दर नमूद करावा. नंतर या संदर्भात कोणत्याही प्रकारच्या तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.

५. **निविदाधारकाने आपला संपूर्ण पत्ता दुरध्वनी व भ्रमणध्वनी क्रमांकासह निविदेमध्ये लिहावा.** या पत्त्यावर पाठविलेले पत्र निविदाधारकास मिळाले आहे , असे गृहीत धरण्यात येईल.

६. सर्व कागदपत्रे सुस्पष्ट दिसतील अशा पद्धतीने अपलोड करावीत.

## ५) <u>निविदा अर्ज उघडणे / स्विकृती व वाटपपत्र</u> :

१. जाहिरातीमध्ये नमूद केल्याप्रमाणे निश्चित केलेल्या दिवशी प्राधिकरण ठरवेल त्या ठिकाणी उपस्थित निविदाधारकांसमक्ष अथवा नेमून दिलेल्या प्रतिनिधींसमक्ष निविदा Online उघडण्यात येतील. या दिवशी काही अपरिहार्य कारणामुळे / परिस्थितीमुळे निविदा उघडणे शक्य न झाल्यास उपस्थित निविदा भरणाऱ्यांना निविदा उघडणेबाबतचा दिनांक कळविणेत येईल. तसेच सदरचा दिनांक प्राधिकरणाचे वेबसाईटवर प्रसिद्ध करणेत येईल.